संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान वितरीत करण्याबाबत (२२३५ ३०४१)

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र.बीजीटी- २०१७/प्र.क्र.१०६/का-८,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक २६ मार्च, २०१८.

वाचा : १) समक्रमांकाचा शासन निर्णय दि .१८.८.२०१७
२) महिला व बाल विकास विभाग , शासन निर्णय बालगृ- २०१८/प्र.क्र.१६/का-८,दि. २६.२.२०१८

प्रस्तावना :

सन २०१७-१८ साठी निराश्रित अनाथ,बेघर इ. संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणा-या स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी (२२३५ ३०४१), ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली रु. ११९५.७० लक्ष निधी अर्थसंकल्पित केला असून सदर निधीपैकी संदर्भ क्र. १ दि. १८.८.२०१७ च्या परिपत्रकान्वये ७० टक्केच्या प्रमाणात रु. ८३६.९९ लक्ष इतका निधी क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध करण्यात आला आहे. संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयाअन्वये स्वयंसेवी संस्थांना देण्यात येणा-या सहायक अनुदानात एकूण प्रति प्रवेशित प्रति माह रू. २०००/- या प्रमाणे वाढ करण्यात आली असून सदर वाढ दि. ०१.०४.२०१७ पासून लागू करण्यात आली आहे. वित्त विभागाकडून सुधारित अंदाज २०१७-१८ प्रकाशित करण्यात आले असून त्यानुसार उपलब्ध होणारा उर्वरित निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

शासन निर्णय :

निराश्रित अनाथ,बेघर इ. संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणा-या स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी (२२३५ ३०४१), ३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली सुधारित अंदाज २०१७-१८ च्या रू. १०७६.१३ लक्ष निधीच्या मर्यादेत उर्वरित रु.२३९.१४ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर प्रयोजनार्थ होणारा खर्च मागणी क्र.एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०२, बालकल्याण, (०२) स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान (०२) (०३) संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान (२२३५-३०४१), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली खर्च करण्यात यावा.

३. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उक्त लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध केलेला निधी संगोपन व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांसाठी संस्था चालविणा-या स्वयंसेवी संस्थांना शासन निर्णय दि. २६.२.२०१८ च्या नुसार देय असलेल्या सहाय्यक अनुदान देण्यासाठी प्राधान्याने खर्च करणे व त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणे, याची दक्षता आयुक्त, महिला व बाल विकास,

पुणे यांनी घ्यावी. तसेच वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे आणि संदर्भाधीन परिपत्रकातील सर्व अटी/शर्तीचे पालन करावे.

४. याकरिता आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. वित्त विभागाच्या संदर्भाधीन परिपत्रकात नमुद तपासणी सूची व विभागास लागू होणा-या बाबींची पूर्तता होत असल्याने विभागाच्या स्तरावरून निधी वितरणास शासन मान्यता देण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संकेतांक क्रमांक २०१८०३२८१०२६५२४४३० असा आहे .सदरचा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Smita Dattatray Nivatkar

Digitally signed by Smita Dattatray Nivatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3fa46cf1e928518ffc98619187a1ef6de2dd57c16934e9cb6672cc02aa258b08, cn=Smita Dattatray Nivatkar
Date: 2018.03.28 10:28:41 +05'30'

(स्मिता निवतकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल, यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई .
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ .मुंबई .
४) मा.सभापती/उपसभापती विधानपरिषद ,महाराष्ट्र विधानमंडळ .मुंबई .
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा /विधानपरिषद,महाराष्ट्र विधीमंडळ.
६) मा.मंत्री (म व बा वि)/ राज्यमंत्री(म व बा वि),यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई .
७) सचिव, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
८) प्रधान सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
९) आयुक्त , महिला व बाल विकास आयुक्तालय,म.रा. पुणे.
१०) महालेखापाल १, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),मुंबई
११) महालेखापाल २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
१२) सर्व उपसचिव ,सर्व अवर सचिव, महिला व बाल विकास. नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
१३) उपायुक्त (बालविकास) महिला व बाल विकास आयुक्तालय, म.रा.पुणे.
१४) कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७) मंत्रालय, मुंबई -३२
१५) सर्व कार्यासने, महिला व बाल विकास विभाग, नवीन प्रशासकीय भवन , मुंबई
१६) निवड नस्ती का-८.